# पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्रमांक : ८० / २०१३**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१२–१३ साठी एम. फिल अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ३०००/— व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांना दरमहा रु. ६०००/— खालील नियम व अटींनुसार शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

१) एम. फिल. अभ्यासक्रमासाठी सन २०१२–१३ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावनोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढे १८ (अठरा) महिन्यांच्या कालावधीसाठी अथवा त्यांच्या नोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेशाच्या (Provisional Admission) दिनांकापासून शोधनिबंध सादर करण्याच्या तारखेपर्यंत, यामध्ये जे प्रथम घडेल तोपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येईल.

२) पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी सन २०१२–१३ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावनोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढे चार वर्षांच्या कालावधीसाठी शिष्यवृत्ती देण्यात येईल.

३) प्रत्येक विद्यार्थ्याची हजेरी दरमहा ७५ टक्के असणे आवश्यक आहे, विद्यार्थ्यांची हजेरी त्याचे मार्गदर्शक व संबंधित विभागप्रमुखांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

४) पीएच.डी. व एम. फिल. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी./एम. फिल. साठी आवश्यक असणारे सर्व नियम व अटी बंधनकारक राहतील.

५) पीएच.डी./एम. फिल. साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

६) एम. फिल. अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची पूर्णवेळ नोंदणी होणे आवश्यक आहे.

22/3/2013

सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : शै. प्रवेश/७७५
दिनांक : २२/०३/२०१३

# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६०
फॅक्स : २५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.


संदर्भ : प.प्रवेश/७७६

दिनांक :— २२/०३/२०१३

प्रति,
मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग,
पुणे विद्यापीठ,
पुणे — ४११ ००७.

मा. संचालक/प्राचार्य
पुणे विद्यापीठाशी संलग्न सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्र

**विषय : एम.फिल./पीएच.डी. शिष्यवृत्ती बाबत.**

महोदय/ महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मध्ये एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांने विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह व विभागप्रमुखांच्या शिफारशीसह शैक्षणिक प्रवेश विभागाकडे सादर करावेत.

सोबत अर्जाचा विहित नमुना जोडला आहे. शिष्यवृत्तीची आवेदन पत्रे खाली नमूद केलेली माहिती यादी सह स्वतंत्ररित्या पाठवावी.

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रवेश दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

एम.फिल/पीएच.डी. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. विद्यार्थ्यांने एम.फिल/पीएच.डी. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मध्ये प्रवेश घेतलेला असावा.
२. विद्यार्थ्यांने इतर कोणत्याही दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.
३. विद्यार्थी हा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती वगळता इतर शिष्यवृत्ती किंवा आर्थिक लाभ उदा. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचे मानधन घेत नसावा.
४. विद्यार्थी पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ नोकरी करीत नसावा.
५. पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. २ लाख पेक्षा अधिक नसावे त्या संदर्भात तहसिलदाराचे प्रमाणपत्र अथवा ग्राहय धरता येईल असा इतर पुरावा सादर करण्यात यावा.
६. विद्यार्थ्यांने तीन वर्षात एम.फिल. पुर्ण करावे तसे अभिवचन त्याच्या कडून रू. १००/– च्या स्टॅम्पपेपर वर लिहून घ्यावे.
७. विद्यार्थी हा नियमित वर्गात उपस्थित राहिला पाहिजे.

मा. विभाग प्रमुख/मा. संचालक/प्रचार्य, मान्यताप्राप्त संशोधन केंद्र यांनी पात्र विद्यार्थ्यांचे आवश्यक त्या कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज परीपूर्ण व अचूकपणे भरून शैक्षणिक प्रवेश विभागाकडे दिनांक ३० मार्च २०१३ पर्यंत सादर करावेत. दिनांक १ एप्रिल २०१३ नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी हि विनंती.

कळावे,

आपला,

21/3/2013

सहा. कुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

[This form should be submitted through the Head of the Place of Research only.]

# UNIVERSITY OF PUNE

## Application for Research Stipend

To,
The Registrar,
University of Pune,
Pune-411007.

Sir,

I am a Research student of M.Phil./Ph.D. doing research in ............................................................ (place of research). I hereby apply for the Research stipend during the year ...................... . The required information about myself is as follows :

1. Name in full : ...........................................................................................................................
   *(beginning with Surname in Block Letters)*
2. Address : ..................................................................................................................................
   *(for correspondence)*
3. Birth Date, Age (completed years) : ...........................................................................................
4. Whether belonging to SC/NT/SBC/OBC/ST : ...............................................................................
5. Academic Record (attach certificate) : ........................................................................................

   *Master's Degree* *Year of Passing* *Marks Obtained / Out of* *% Examining body*

   ...................................................................................................................................................

6. Date of Registration for M.Phil./Ph.D. : ......................................................................................
   (Attach (a) Xerox copy of Registration letter, (b) Plan of work including time schedule.)

I have read the rules regarding the award of Research Stipend and I undertake to abide by them. I also declare that I do not receive any financial assistance from any agency nor am I employed anywhere.

Place : ..................

Date : ..................

.................................................
Signature of the applicant

The student has registered his name under my guidance.

Name of the Guide : ........................................................................................

Subject and Place of Research : ..........................................................................

...........................................................................................................................

Recommendation of the Guide : ..........................................................................

...........................................................................................................................

Date : .........................

.......................................
Signature of the Guide

Forwarded to the Assistant Registrar (Admission) with recommendations or remarks.

Date : .........................

.................................................................
Signature of the Head of the Department